# शासकीय तंत्रनिकेतन, खामगांव

जलंब रोड, खामगांव-444303, जि. बुलडाणा (महाराष्ट्र राज्य)

Phone No.- (07263) 252278,256644 E-mail:- office.gpkhamgaon@dtemaharashtra.gov.in


**विद्यार्थ्यांकरिता सूचना**

क्र. : शातनिखा/वि.वि /शिष्यवृत्ती /सूचना/2020/50
दिनांक : 05/01/2020

**विषय : संस्थेतील शिष्यवृत्ती व तत्सम सवलतींकरीता अर्ज करणा-या सर्व विदयार्थ्यांनी स्वत:चे आधार कार्ड त्यांच्या बँक खात्याशी (National Payments Corporation of India) NPCI मध्ये Link करण्याबाबत.**

वरील विषयानूसार शिष्यवृत्ती व तत्सम सवलतींकरीता अर्ज करणा-या संस्थेतील सर्व विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी सदर सवलतींचा लाभ घेण्यासाठी **स्वत:चे आधार कार्ड लवकरात लवकर शिष्यवृत्तीकरीताच्या बँक खात्याशी जोडावे.** तसेच संबंधित बँकेने आपले आधार कार्ड व बँक खाते जोडल्याची प्रक्रीया (National Payments Corporation of India) NPCI वर केलेली आहे की नाही याची खात्री करावी. त्याकरीता विद्यार्थ्यांनी संबंधीत बँकेत जावून आधार कार्ड व बँक खाते **NPCI मध्ये Link** करण्याकरीताचा अर्ज भरुन बँकेत जमा करावा.

सदर प्रक्रीयेनंतर **विद्यार्थ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर तसेच 'आधार' च्या (UIDAI) वेबसाईटवर My Aadhar या ऑप्शन मधून आपले आधार/बँक लिंकींग स्टेटस तपासावे**. तसे न केल्यास संबंधीत विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती मिळण्यास अडचणी निर्माण होवू शकतात.

ज्या विदयार्थ्यांचा आधार क्रमांक शिष्यवृत्तीकरीताच्या बँक खात्याशी NPCI मध्ये Link राहणार नाही अशा विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती/फ्रिशीप प्राप्त न झाल्यास त्याकरीता संस्था जबाबदार राहणार नाही. तसेच त्याकरीता विदयार्थी जबाबदार राहणार, याची सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

**टिप** - विदयार्थ्यांनी दररोज सातत्याने **संस्थेची वेबसाईट व व्हाटसॲप ग्रुपवरील सूचना बघाव्यात**. तसेच ऑनलाईन अर्ज भरल्यावर त्याची एक प्रत आणि सोबत लागणा-या नमुद कागदपत्रांचा एक झेरॉक्स सेट व **आयडी-पासवर्ड स्वत:जवळ नेहमीकरीता सांभाळून ठेवावा**.

**TFWS या योजनेअंतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांना नियमानूसार कुठलीही शिष्यवृत्ती लागू नसल्यामुळे अशा विदयार्थ्यांनी शिष्यवृत्तीकरीता अर्ज करु नये.**

(डॉ.एस.एस.प्रभुणे)
प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन खामगांव

प्रतिलिपी- माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना -

1. मुख्य सुचना फलक.
2. वसतीगृह मुलांचे व मुलींचे ,शासकीय तंत्रनिकेतन,खामगांव.
3. सर्व विभाग प्रमुख - संगणक अभि./अणुविदयुत अभि./विदयुत अभि./ स्थापत्य अभि./यंत्र अभि.